**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-१६**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :-२४/२/२०१२

प्रति,
मा. ----------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.१६ मंगळवार दि.२८/२/२०१२ रोजी दुपारी १.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये अहमदनगर महानगरपालिका.

**मंगळवार दिनांक-२८/२/२०१२ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ८४ | मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ बुधवार दि.२५/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ८५ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रियदर्शनी शॉपींग सेंटर सर्जेपुरा येथील पहिल्या मजल्यावरील १९४२.१९ चौ.फुट चा हॉल उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांना कार्यालयीन रेकॉर्ड जतन करणेकामी रूपये १९,०००/- फक्त दरमहा भाडे आकारून भाडे तत्वावर देणेस मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८६ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ डॉ.श्री.सुभाष फिरोदिया, डॉ. श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावरील करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८७ | अहमदनगर महानगरपालिकेस सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे खडी, डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, पॅचिंगसाठी, सिमेंट राळा, चाळलेली वाळू इ. बांधकाम साहित्य निविदा दर मटोरिअल खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८८ | अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेच्या प्रवासी भाडे दरामध्ये डिझेल, टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजुरी मिळणेबाबत मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि. चे मुख्य कार्य. अधिकारी श्री. रोहित परदेशी यांचा दिनांक १/०२/२०१२ अर्जानुसार व मा.स्थायी समिती ठराव क्र.७९ दि.२५/०१/२०१२ नुसार सर्व माहिती व त्यावरील ऑफिस रिपोर्ट फेरसादर. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्र. ८४ - मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १४ बुधवार दिनांक २५/०१/२०१२ रोजीच्या सभेच्या इतिवृत्ताची प्रत

२] विषय-क्रमांक- ८५ ते ८८ च्या प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १६**

विषय क्रमांक- ८४ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

ठराव क्रमांक-८४ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ बुधवार दिनांक २५/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ बुधवार दिनांक २५/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्यें वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक२५/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.सौ. शिंदे र.अ. :- मागील इतिवृत्त कायम करतांना डॉ.श्री. एन.एस.पैठणकर उपआरोग्याधिकारी व श्री. एस.एस. परशरामी सहाय्यक आयुक्त यांना वाहन प्रतिपूर्ती लागू करण्यात यावी. तशी नोंद मागील इतिवृत्त कायम करताना त्यात घ्यावी.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- त्यांचे वाहन प्रतिपुर्ती प्रस्ताव नव्हते. त्यामुळे संबंधीत विभागामार्फत प्रस्ताव आल्या नंतर मा.स्थायी समिती समोर विषय घेता येईल.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- मागील सभा दिनांक २५/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- मागील सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :-मा.स्थायी समिती सभा दिनांक २५/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठरावः-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-१४ बुधवार दिनांक २५/०१/२०१२ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री.डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१६**

विषय क्रमांक-८५ मंगळवार दिनांक २८/२/२०१२

ठराव क्रमांक -८५ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रियदर्शनी शॉपींग सेंटर सर्जेपुरा येथील पहिल्या मजल्यावरील १९४२.१९ चौ.फुट चा हॉल उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांना कार्यालयीन रेकॉर्ड जतन करणेकामी रूपये १९,०००/- फक्त दरमहा भाडे आकारून भाडे तत्वावर देणेस मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मार्केट वसुली विभाग दिनांक ०३/१२/२०११

विषय-उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास कार्यालयीन रेकॉर्ड जतन करण्याकरीता इमारत मिळणेबाबत.

मा.सादर,

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे सर्व रेकॉर्ड सध्या औरंगाबाद रोडवरील एका खाजगी निवासस्थानामध्ये जतन करून ठेवण्यात आले आहे. संबंधीत मालकास जागेची आवश्यकता असल्याने जागा खाली करून देणे आहे. शासकीय रेकॉर्ड जतन करून ठेवणेकरीता साधारणपणे २००० स्क्वे. फुट बांधकाम असलेली आपल्या अधिपत्याखालील रंगभवन तसेच सावेडी अथवा या कार्यालयाजवळ असलेली इमारत उपलब्ध असल्यास तसे कळविण्यांत यावे. असा अर्ज मार्केट विभागास प्राप्त झालेला आहे.

तरी महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्जेपुरा रंगभवन पहिल्या मजल्यावरील हॉल व तसेच सर्जेपुरा प्रियदर्शनी शॉपींग सेंटर येथील पहिल्या मजल्यावरील हॉल, संत कैकाडी महाराज शॉ. सेंटर येथील पहिल्या मजल्यावरील हॉल सद्यस्थितीत रिकामे आहेत. याबाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते व तद्नंतर संबंधीतास तसे कळविणे योग्य वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (कर) :- सहमती दर्शक सही दि.२/०१/२०१२

नगररचनाकार :-संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल मधील हॉल बाबत मनपाच्या विविध विभागास आवश्यकता आहे. किंवा नाही याबाबत विचारणा करून सर्जेपुरा रंगभवन व प्रियदर्शनी शॉपींग सेंटरसह सविस्तर रिपोर्ट मा.उपायुक्त साहेब यांचेकडे सादर करावा.याबाबत निर्णय झाल्यानंतर फक्त अनामत रक्कम तसेच भाडेमुल्य ठरविणेसाठी प्रस्ताव या विभागात पाठवावा.

--**--

मार्केट विभाग दि. १८/१/२०१२

फेरसादर,

संत कैकाडी महाराज व्यापारी संकुल मधील हॉल बाबत प्राथमिक चौकशी केली असता सदर हॉलमध्ये प्र.स.क्र.२ चे विविध प्रकारचे रेकॉर्ड जतन करून ठेवण्यात आलेले आहे. तसेच फर्निचर, केबिन आहे. व सर्जेपुरा रंगभुवन शॉपींग सेंटर येथील गाळेधारकांना ८१ब २ अन्वये गाळा खाली करणेबाबतच्या नोटीसा देवुन सुनावणी सुध्दा झालेली आहे. सदर शॉपींग सेंटरमध्ये नव्याने नाटयगृह बांधण्याची कार्यवाही प्रस्तावीत आहे. सर्जेपुरा प्रियदर्शनी शॉपींग सेंटर येथील पहिल्या मजल्यावरील १९४२.१९चौ.फु.चा हॉल सद्यस्थितीत रिकामा आहे.सदरच्या हॉलची मुळ संचिका सोबत जोडली आहे.

तरी, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयास सर्जेपुरा प्रियदर्शनी शॉपींग सेंटर येथील प.म. हॉल भाडे तत्वावर देणेकामी हॉलचे भाडे व अनामत रक्कम किती घ्यावी याबाबत मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (कर) :- सदर प्रस्तावाबाबत भाडेदर व अनामत रक्कम ठरविणेकामी T.P. मार्फत अहवाल घेउन फेरसादर करावे.

--**--

नगररचना विभाग दि. ३/२/२०१२

सादर,

विषय :- सर्जेपुरा प्रियदर्शनी व्यापारी संकुल मधील पहिल्या मजल्यावरील हॉलचे भाडेमुल्य व अनामत रक्कम बाबत.

उपरोक्त विषयांकित संकुलामधील पहिल्या मजल्यावरील हॉलचे मुल्यांकंन अहवाल खालील प्रमाणे देत आहे.

- हॉलचे क्षेत्र- १९४२.१९ चौ. फुट (१८०.५० चौ.मी.) कारपेट एरिया
- बांधकामाचे क्षेत्र- १९४२.१९ चौ.फुट x१.२५=२४२७.७३चौ. फुट (२२५ चौ.मी.)
- जागेचा दर- (सन २०१२ शिघ्र सिध्द गणकानुसार) रूपये ५७००/- प्रति चौ.मी.
- बांधकामाचा दर- (सन २०१२ शिघ्र सिध्द गणकानुसार) रूपये ९५००/- प्रति चौ.मी.
- इमारतीच्या वय ३५ वर्ष असल्याने बांधकाम दरात घट (५०%) रूपये ४७५०/-
- इमारत बांधकामाचा दर+ जागेचा दर = रूपये ४७५०+रूपये ५७०० = रूपये १०४५०/-
- देखभाल खर्च व वसुली खर्च इत्यादी- १५% वाढ रू.१०४५०/-x०.१५= रू. १५६८/- रू.१०४५०/- + रू. १५६८/- = रू. १२०१८/-
- पहिल्या मजल्यावर बांधकाम असल्याने दरामध्ये ३०% सुट = रू. ३६०५/- रू.१२०१८-३६०५ = रू. ८४१३/- प्रति चौ.मी.
- एकुण दर रूपये ८४१३/-
- बांधकामाचे क्षेत्र- २२५ चौ.मी. x दर रूपये ८४१३/- = रू. १८,९२,९२५/- हे जागेचे एकुण मुल्य
- जागेच्या एकुण मुल्याच्या १२% इतके उत्पन्न महानगरपालिकेस मिळणे आवश्यक आहे.
- वार्षिक भाडे = रू. १८,९२,९२५x१२% = रू.२,२७,१५१/-
- दरमहा भाडे = रू. २,२७,१५१/- — १२ = रू.१८,९२९/-

सबब उपरोक्त हॉलसाठी दरमहा रू. १९०००/- इतके भाडे आकारणी करणे योग्य होईल. तसेच शासकीय कार्यालय असल्याने अनामत रक्कम घेणे योग्य होणार नाही.

येणे प्रमाणे नगररचनाकार यांचा अहवाल असे.

--**--

मार्केट विभाग दि.३/२/२०१२

फेरसादर,

उपप्रोदशिक परिवहन कार्यालयास प्रियदर्शनी शॉपींग सेंन्टर येथील पहिल्या मजल्यावरील हॉल भाडेतत्वावर देणे बाबत मा.नगररचनाकार यांचे अभिप्राय घेतला असता. सबब उपरोक्त हॉल साठी दरमहा रू.१९०००/- इतके भाडे आकारणी करणे योग्य होईल. तसेच सदरचे कार्यालय शासकीय असल्याने अनामत रक्कम घेणे योग्य होणार नाही असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी मा. नगररचनाकार यांच्या अभिप्रायानुसार मा.स्थायी समिती समोर निर्णयार्थ ठेवणे योग्य होईल. असे मत आहे तथापी आदेशार्थ सादर. / **अ**

येणेप्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन यांचा अहवाल असे

मा.उपायुक्त (कर) :- **"अ"** प्रस्तावानुसार पुढील आदेशार्थ सादर. दि.६/२/२०१२

मा.आयुक्त साहेब :- मा.स्थायी समिती पुढे ठेवा. दि.८/२/२०१२

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रियदर्शनी शॉपींग सेंटर सर्जेपुरा येथील पहिल्या मजल्यावरील हॉल उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांना कार्यालयीन रेकॉर्ड जतन करणेकामी दरमहा भाडे आकारून भाडे तत्वावर देणेस मंजुरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा. सौ. गायकवाड नि.व. :- अटी व शर्तीनुसार ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- अटी व शर्तीनुसार ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रियदर्शनी शॉपींग सेंटर सर्जेपुरा येथील पहिल्या मजल्यावरील १९४२.१९ चौ.फुट (१८०.५० चौ.मी.) कारपेट एरिया चा हॉल उपप्रादेशिक परिवहन कार्यालय , अहमदनगर यांना कार्यालयीन रेकॉर्ड (अभिलेख) जतन करणेकामी रूपये १९,०००/- (रूपये एकोणवीस हजार ) फक्त दरमहा भाडे आकारून भाडे तत्वावर अटी व शर्तीनुसार देणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत. सही /-

अनुमोदक :-मा.श्री. डागवाले किशोर आसाराम सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१६**

विषय क्रमांक-८६ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

ठराव क्रमांक -८६ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ डॉ.श्री.सुभाष फिरोदिया, डॉ. श्री. अनिरूध्द गिते व डॉ.श्री. सुचित तांबोळी यांची बालरोग तज्ञ म्हणून (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरिता मानधनावरील करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. आस्थापना विभाग जा.क्र. वर्क.११५ दि.१८/२/२०१२

प्रस्तावना-विषय- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत.

सादर,

विनंती की, मा.मुख्य वैद्यकीय अधिकारी बा.दे.दवा. यांनी त्यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतिका गृह ७३३ दि.२३/१/२०१२ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "कै.बा.दे. दवाखाना व सुतिका गृह येथे बालरोग तज्ञ डॉक्टराची आवश्यकता नेहमी भासते. आस्थापना सुचीवर बालरोग तज्ञाचे पद मंजूर नसल्यामुळे बालरोग तज्ञ डॉक्टारांची (ऑनररी बालरोग तज्ञ म्हणून ) मानधनावर नेमणूक करावी लागते. कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह येथे मानद बालरोग तज्ञ म्हणून १) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया M.D.२) डॉ.श्री.अनिरूध्द गिते M.D., ३) डॉ.श्री.सुचित तांबोळी M.B.B.S.D.C.H.P.G.D.M.L.S. यांची जा.क्र. आस्था. /कंत्राटी करार नेमणुक ९२१ दिनांक ०५/७/२०११ अन्वये दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर दि.२८/६/२०११ ते २७/१२/२०११ अखेर सहा महिन्या करिता नेमणुक केलेली होती. सदरच्या नेमणुकीची मुदत दि.२७/१२/२०११ रोजी संपत आहे. वरील तीन बालरोग तज्ञ डॉक्टरांनी त्यांची मुदत संपत आल्यामुळे कै.बा.दे.दवाखान्यामध्ये मानधनावर रूग्णांना वैद्यकीय सेवा देण्यासाठी पुढील काळासाठी नेमणुक चालु ठेवण्याबाबत विनंती अर्ज दिलेले आहेत. वरील बालरोग तज्ञ दवाखान्यातील नवजात अर्भकांची तपासणी करून औषधोपचार करतात. त्यामुळे दवाखान्यात येणा-या गरीब व गरूजु रूग्णांना त्याचा जास्तीत जास्त फायदा होतो. आपल्या दवाखान्यामध्ये प्रामुख्याने बाळंत केसेस असल्याने बालरोग तज्ञ असणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून हॉस्पीटलची व पर्यायाने पेशंटची गैरसोय होउ नये या करीता १) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया ,२) डॉ.श्री.अनिरूध्द गिते , ३) डॉ.श्री.सुचित तांबोळी या बालरोग तज्ञांची मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये एक दिवसाचा तांत्रिक खंड देउन दि.२९/१२/२०११ ते दि.२८/६/२०१२ अखेर सहामहिन्याकरिता दरमहा रू.१५००/- च्या मानधनावर नेमणुक होणेस आस्थापना विभागास आदेश होणेस विनंती आहे. असे नमुद करून सुचित केलेले आहे.

तरी मा. मुख्य वैद्यकीय अधिकारी, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना करीता १) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया-एम.डी.,२)डॉ.श्री.अनिरूध्द गिते-एम.डी.३) डॉ.श्री.सुचित तांबोळी एम.बी.बी. एस.डी. सी. एच.पी.जी.डी.एम.एल.एस. यांची जा.क्र. आस्था / कंत्राटी करार नेमणूक ३३०९ दिनांक १५/०२/२०१२ अन्वये तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) या पदावर नेमणुक आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे कंत्राटी करारानुसार दरमहा रूपये १५००/- (अक्षरी रूपये एक हजार दहा पाचशे मात्र) या मानधनावर दिनांक २९/१२/२०११ ते २८/०६/२०१२ अखेर सहा महिन्याच्या कालावधी करीता केलेल्या करारबध्द नेमणूकीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती पुढे सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे
सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे तात्पुरत्या स्वरूपात बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) यांची कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.सातपुते दि.ना. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- महानगरपालिकेच्या कै.बा.दे.दवाखानामध्ये सध्या किती डॉक्टर कार्यरत आहेत.

प्र.आरोग्य अधिकारी डॉ. श्री. राजूरकर :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात सध्या ३ प्रकारचे डॉक्टर कार्यरत आहेत. (१) स्थायी आस्थापनेवर डॉ. पाटिल , डॉ. पाठक कार्यरत आहेत. (२) आर.सी.एच.अंतर्गत कंत्राटी पध्दतीने डॉ. बागल कार्यतर आहेत ते सध्या ओ.पी.डी. पहातात. (३) डॉ. फिरोदिया , डॉ. तांबोळी व डॉ. गिते यांना तातडीच्या कामाकरीता व्हीजीट बेसीस वर बोलावले जाते. त्यांना आपण दरमहा रूपये १५००/- मानधन देतो. कमी खर्चात चांगल्या डॉक्टरांची सुविधा आपण रूग्णांस देण्याचा प्रयत्न करतो. त्यांची आपण ६-६ महिन्यांची नेमणुक करतो. प्रत्येक ६ महिन्यानंतर आपण त्यांना मुदतवाढ देत असतो.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- अशा ६ महिन्या ऐवजी त्यांना १ वर्षाची मुदतवाढ देण्यांत यावी.

प्र.आरोग्य अधिकारी डॉ. श्री. राजूरकर :- आर.सी.एच. कार्यक्रमाअंतर्गत आपण ११ महिन्याच्या कंत्राटी बेसीसवर डॉक्टांच्या नेमणूका करतो. भूलतज्ञांची पण महानगरपालिकेस सेवा आवश्यक आहे. त्यांनाही ११ महिने करारानेच घ्यावे

मा.श्री. डागवाले कि.आ :- डॉ. श्री. बोरगे चा कार्यभार डॉ.श्री. राजूरकर यांचेकडे दिला याची आम्हा सदस्यांना काही कल्पना नाही.

आस्थापना वि. प्रमुख श्री. सोनवणे :- सदरचा चार्ज डॉ. राजूरकर यांना देण्यांत आलेला आहे. आपण अशा बदलांचे आदेश फक्त अधिकारी - पदाधिकारी व विभाग प्रमुखांना देतो.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदस्यांनाही माहितीसाठी प्रत दयावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- रक्तपेढी बाबत काय सुधारणा केली.

प्र.आरोग्य अधिकारी डॉ. श्री. राजूरकर :- रक्तपेढीच्या नुतनीकरणाबाबत महानगरपालिकेस १ महिन्याची मुदत दिली आहे. त्यानुसार अंतर्गत कामे सुरू केलेली आहेत त्यात रक्तपेढीसाठी लागणारा कर्मचारी वर्गाबाबत स्वतंत्र सविस्तर प्रस्ताव सादर करावयाचा आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सर्वसुधारणा झाल्यानंतर स्थायी समिती सदस्यांना पहाणी करण्यासाठी बोलवा.

प्र. आरोग्य अधिकारी डॉ. श्री. राजूरकर :- होय, पहाणी करण्यासाठी बोलविण्यांत येईल.

मा.श्री. सातपुते दि.ना.:- डॉक्टर नेमणूक करताना ६ महिन्या ऐवजी ११ महिने नेमणूक करण्यात यावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- कार्यात्तर मंजुरी देण्यांत येत असल्याने ऑफिस रिपोर्टानुसार मंजुरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गायकवाड नि.व. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बा.दे.दवाखाना व सुतिकागृह येथे तात्पुरत्या स्वरूपात १) डॉ.श्री. सुभाष फिरोदिया-एम.डी.,२)डॉ.श्री.अनिरूध्द गिते-एम.डी.३) डॉ.श्री.सुचित तांबोळी एम.बी.बी.एस.डी.सी. एच.पी.जी.डी.एम.एल.एस. यांची यांची बालरोग तज्ञ (ऑनररी डॉक्टर) म्हणून कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे दिनांक २९/१२/२०११ ते २८/०६/२०१२ अखेर सहा महिन्याकरिता दरमहा रूपये १५००/- (अक्षरी रूपये एक हजार पाचशे मात्र) प्रत्येकी , मानधनावर करार बध्द नेमणुकीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.डागवाले किशोर आसाराम सही /-

अनुमोदक :-मा.सौ. गायकवाड निलीमा वसंत सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१६**

विषय क्रमांक-८७ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

ठराव क्रमांक -८७ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेस सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे खडी, डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, पॅचिंगसाठी, सिमेंट राळा, चाळलेली वाळू इ. बांधकाम साहित्य निविदा दर मटोरिअल खरेदी कामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा दरास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. स्टोअर विभाग दिनांक २२/०२/२०१२

विषय :- सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे खडी, डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, पॅचिंगसाठी, सिमेंट राळा, चाळलेली वाळू इ. बांधकाम साहित्य निविदा दर मंजुरीबाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट की, सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे खडी, डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल पॅचिंगसाठी, सिमेंट , राळा, चाळलेली वाळू इ. बांधकाम साहित्य पुरवठण्यासाठी मा. महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांकः मातसं/ नस्ती २०१०/प्र.क्र.३४/३९ सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि.६ ऑगस्ट २०१० अन्वये ई - निविदा कार्य प्रणालीचा अवलंब करून तसेच निविदा प्रक्रिया कालावधीस दोन वेळेस मुदतवाढ देवुन व जाहिर फेर टेंडर नोटीस (तिसरी वेळ) प्रसिध्द करून वार्षिक निविदा मागविल्या असता मुदतीत-

१) मे. तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन , अहमदनगर
२) मे.साई प्रॉडक्टस्, कोपरगाव.

याप्रमाणे दोन निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांचे व्यापारी (दराचे) लिफाफे दि.०९/०१/२०१२ रोजी उघडण्यात येवुन निविदा दराचा तुलनात्मक तक्ता पाहता- अ.क्र. १ ते २१ चे दर मे. तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन , अहमदनगर यांचे स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी असल्याने त्यांना निविदा दर वाटाघाटीसाठी निविदा प्रशासकीय छाननी समिती समोर दि.०६/०२/२०१२ रोजी दुपारी ४.०० वाजता समक्ष उपस्थित राहणेबाबत जा.क्र. स्टोअर विभाग २१३ दि.०३/०२/२०१२ अन्वये कळविले असता त्यांनी समक्ष उपस्थित राहून अ.क्र. १ ते २१ चे साहित्याचे निविदा दर कमी करून तसे लेखी संमतीपत्र दिलेले आहे. त्यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेले दर निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१० मध्ये नमुद केलेले आहेत. निविदाकार मे. तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन , अहमदनगर यांनी निगोसिएशन नंतर दिलेल्या दराची सन २०११-२०१२ चे मंजुर डी.एस.आर. दराशी तुलना करता सदरचे दर उपलब्ध डी.एस.आर. दरापेक्षा जास्तीचे नाहीत.

निविदाकार मे. तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेले अ.क्र. १ ते २१ चे (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१० मध्ये नमुद) दरास मंजुरी देणे बाबत शिफारस प्रशासकीय निविदा छाननी समितीमार्फत करण्याचे ठरले आहे.

सदर निविदा बाबत स्टोअर विभाग दि.०६/०२/२०१२ चे प्रस्तावावर मा.आयुक्त , मा.उपायुक्त (कर), मा.मुख्यलेखाधिकारी तथा मुख्य लेखापरिक्षक यांनी अभिप्रायासह स्वाक्षरी केलेली आहे.

तरी निविदाकार मे. तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेले अ.क्र. १ ते २१ चे (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१० मध्ये नमुद) दरास तसेच नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजूरी मिळावी ही विनंती. आदेशार्थ सविनय सादर.

सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभे पुढे निर्णयास्तव सविनय सादर.

सोबत- मंजुरीस्तव सादर केलेले निविदा दर

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

-- ** --

**निविदाकार- मे. तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन, अहमदनगर.**

| टेंडर यादी क्र. | मालाचा तपशिल | निगोसिएशन नंतर कमी करून दिलेले दर |
|---|---|---|
| १ | हातफोड खडी<br>साईज- १ १/२" x२" | रू.१,३१४=००<br>प्रती ब्रास |
| २ | मशिन फोड खडी<br>साईज- अ) १ १/२"<br>ब) १"<br>क ) ३/४"<br>ड) १/२"<br>ई) १/४" | <br>रू. १,३२९=०० / प्रती ब्रास<br>रू. १,२८८=०० / प्रती ब्रास<br>रू. १,५५१=०० / प्रती ब्रास<br>रू. १,५१३=०० / प्रती ब्रास<br>रू. १,३०३=०० / प्रती ब्रास |
| ३ | राळा १/४" | रू.९८८=००<br>प्रती ब्रास |
| ४ | डांबर मिश्रीत हॉट-मिक्स माल पेचिंगसाठी ५.५०% Bitumen, ६०% १२ mm metal, ४०% ६mm metal. | रू.३,४८०=००<br>प्रती में. टन |
| ५ | सिमेंट आय.एस. आय.मार्क<br>प्रति ५० किलो वजन<br>४३ ग्रेड<br>५३ ग्रेड | <br>रू. ३००=००<br>रू. ३००=००<br>प्रती गोणी |
| ६ | चाळलेली वाळू कोल्हार / पैठण | रू.३,५९०=००<br>प्रती ब्रास |

| | | |
|---|---|---|
| ७ | चाळलेली वाळू लोकल | रू.१,०००=०० प्रती ब्रास |
| ८ | पोयटा माती | रू.६००=०० प्रती ब्रास |
| ९ | शाहबाद फरशी<br>साईज- २'x२'x१ १/२" जाडी | रू.२,२००=०० प्रती ब्रास |
| १० | शाहबाद फरशी<br>साईज- २'x२'x२' जाडी | रू.२,६००=०० प्रती ब्रास |
| ११ | शाहबाद फरशी<br>साईज- २'x१ १/२'x१ १/२" जाडी | रू.३,७३०=०० प्रती ब्रास |
| १२ | शाहबाद फरशी<br>साईज- २'x१ १/२'x२" जाडी | रू.३,८२८=०० प्रती ब्रास |
| १३ | हार्ड मुरूम<br>PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे | रू.५०८=०० प्रती ब्रास |
| १४ | सॉफ्ट मुरूम<br>PWD स्पेसिफिकेशन प्रमाणे | रू.५०८=०० प्रती ब्रास |
| १५ | तांबडया विटा<br>साईज- ९"x ४"x २ १/२" | रू.४,०००=०० प्रती हजार |
| १६ | कुंडया मातीच्या १' व्यास x २' उंच | रू.८०=०० प्रती नग |
| १७ | डबर | रू.८५०=०० प्रती ब्रास |
| १८ | लालमाती | रू.८००=०० प्रती ब्रास |
| १९ | लोखंडी सळया गोल<br>साईज-अ) ६ mm<br>ब) ८ mm<br>क) १० mm | रू.४७=०० प्रती किलो |
| २० | लोखंडी अँगल<br>साईज- अ) २५ x२५ x ३ mm<br>ब) ४० x४० x ३ mm | रू.४८=०० प्रती किलो |
| २१ | वेल्डीग मेश-<br>साईज- १" x १ " | रू.४००=०० प्रती चौ.मिटर |

येणेप्रमाणे स्टोअर विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सन २०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे खडी, डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, पॅचिंगसाठी, सिमेंट राळा, चाळलेली वाळू इ. बांधकाम साहित्य दर मंजुरीबाबत विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.डागवाले कि.आ.:- प्रस्तावात नमुद केलेले मटोरिअल किती दिवसाकरीता खरेदी करावयाचे आहे.

स्टोअर वि. प्रमुख श्री. जाधव ए.जी.:- प्रस्तावात नमुद केलेले मटोरिअल हे सन २०११-२०१२ या वर्षातील आहे. ते फक्त १ महिन्याकरीता खरेदी करावयाचे आहे. सन २०१२-२०१३ करीता लागणा-या मटोरिअल करीता वेगळा प्रस्ताव करावयाचा आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सौ. गंधे सु.मो.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेस सन२०११-१२ या आर्थिक वर्षाकरिता अहमदनगर महानगरपालिकेस लागणारे खडी, डांबर मिश्रीत हॉटमिक्स माल, पॅचिंगसाठी, सिमेंट राळा, चाळलेली वाळू इ. बांधकाम साहित्य (मटोरिअल) खरेदी करणेकामी मागविण्यांत आलेल्या कमीचे निविदा धारक मे.तृष्णा सेल्स कॉर्पोरेशन,अहमदनगर यांनी निगोसिएशन नंतर कमी करून दिलेले अ.क्र. १ ते २१ चे (निविदा दराच्या तुलनात्मक तक्त्यातील कॉलम क्र.१० मध्ये नमुद) दरास मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच नामंजुर निविदाकार यांची निविदा बयाणा रक्कम त्यांना परत करणेस मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री. डागवाले किशारे आसाराम. सही /-

अनुमोदक :-मा.सौ. गंधे सुमन मोहनीराज. सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्रमांक-१६**

विषय क्रमांक-८८ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

ठराव क्रमांक -८८ मंगळवार दिनांक २८/०२/२०१२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेच्या प्रवासी भाडे दरामध्ये डिझेल, टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि. चे मुख्य कार्य. अधिकारी श्री. रोहित परदेशी यांचा दिनांक १/०२/२०१२ अर्जानुसार व मा.स्थायी समिती ठराव क्र.७९ दि.२५/०१/२०१२ नुसार सर्व माहिती व त्यावरील ऑफिस रिपोर्ट फेरसादर.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अ.नगर म.न.पा. मोटार व्हेईकल विभाग दिनांक ०८/०२/२०१२

मा. फेरसादर,

विषय-अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेच्या प्रवासी भाडे दरामध्ये डिझेल, टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत.

संदर्भ :- १) मा.स्थायी समिती ठराव क्र.४४ दि.२३/९/२०११

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.७९ दि.२५/१/२०१२

३)मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु.प्रा.लि.यांचेकडील पत्र जा.क्र.४३/२०१२ दि.१/०२/२०१२

मा.स्थायी समिती ठराव क्र.७९ दि.२५/१/२०१२ अन्वये "अहमदनगर महानगरपालिकेचे शहर बस सेवा प्रवासी भाडे दरात डिझेल, टायर तसेच स्पेअर पार्टच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणे बाबत मा.स्थायी समिती ठराव क्र.४४ दि.२३/९/२०११ अन्वये स्थगित केलेल्या प्रस्तावाबाबत अभिकर्त्याकडून बसेसची संख्या, बससेवा सुरू करते वेळीचे इंधनाचे दर व सध्याचे दर यातील तफावत, बससेवेसाठी दररोज लागणारे इंधन टायर, स्पेअर पार्टचा खर्च व दररोजचे सरासरी उत्पन्न याबाबतची माहितीसह प्रस्ताव पुढील सभेत फेर सादर करण्यात यावा. व अभिकर्ता संस्थेचे जबाबदार व्यक्तीस पुढील सभेत उपस्थित ठेवावे." असा मा.स्थायी समिती ठराव पारीत झालेला आहे.

पारीत ठरावानुसार व दि.०१/०२/२०१२ दिवशी मा.सभापती स्थायी समिती, मा.सदस्य तसेच अभिकर्ता संस्थेचे प्रतिनिधी यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार शहर बस सेवेचे अभिकर्ता संस्था मे. प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि. यांनी डिझेल, टायर, स्पेअर पार्टच्या खर्च व दररोजचे उत्पन्न याबाबत माहिती त्यांचेकडील पत्र क्र. जा.नं.४३/२०१२ दि.०१/०२/२०१२ नुसार इकडेस सादर केलेली आहे. (सोबत पत्र)

करिता सदरचे माहितीसहचे पत्र मा.स्थायी समितीकडील पुढील निर्णयास्तव ठेवणे उचित वाटते. मंजूरीस्तव सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

--**--

मेकॅ.इंजि. :- शहर बसवाहतुक उपक्रमापोटी होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न यांचा सविस्तर तक्ता अभिकर्ता संस्थेने इकडेस सादर केलेला असून सदरचा तक्ता मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य मान्यतेस्तव सादर.

मा.उपायुक्त (कर) :- ME पुढील मुद्दयांसह फेरसादर करावे.

१] शहरात सर्वत्र अंतिम ठिकाणांपर्यत बस जातात त्या थांब्याची नावे, कि.मी. सह

२] शहरात प्रत्येक बसच्या अंतिम थांब्यापर्यत प्रत्येक दिवसाच्या चकरा ? प्रत्येक बसचे प्रत्येक दिवसाचे कि.मी. नुसार प्रवास.

३] करारनामा केल्यापासूनचा जमा-खर्च बाबनिहाय अहवाल.

मॅके. इंजि.- :- मा. फेरसादर, वरील मुद्दयांबाबतची सर्व माहिती अभिकर्ता संस्था "मे. प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्युशन प्रा.लि. " यांचेकडून उपलब्ध करून घेण्यात आली असून ती सोबतच्या जोडलेल्या परिशिष्ट निहाय आहे.

उपरोक्त जोडलेल्या माहितीसह प्रकरण मा.स्थायी समिती पुढे निर्णयास्तव ठेवणे योग्य वाटते. तथापि आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) :- १० कि.मी. च्या पुढे अनेक बस थांबे असल्यामुळे सरसकट रू.०१/- प्रमाणे वाढ करणे उचित होईल तथापि पुढील आदेशार्थ मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवणेसाठी मंजुरीस्तव सादर. दि.२३/२/२०१२

मा.आयुक्त साहेब :- यापुर्वीच प्रशासनाने प्रस्ताव सादर केला असल्याने त्यात कोणताही बदल न करता मा.स्थायी समितीने अपेक्षिलेले संपुर्ण माहितीसह मा.स्थायी समिती पुढे प्रस्ताव फेरसादर करा. दि.२३/०२/२०१२

--** --

अहमदनगर महानगरपालिका शहर बससेवा ,अ.नगर

जा.नं. ४३/२०१२ दिनांक ०१/०२/२०१२

प्रति,
मा.सभापती,
स्थायी समिती ,
अहमदनगर महानगरपालिका

विषय- AMT च्या प्रवासी दरवाढी बाबत.

महोदया,

आपण दूरध्वनीवरून केलेल्या सूचनेनुसार AMT शहर बससेवे बाबतच्या दरवाढीचा जो प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याच्या पुष्टयर्थ खालील खुलासा सादर करण्यात येत आहे.

अहमदनगर शहरामध्ये शहर बससेवा सुरू करण्यात आली त्यावेळीचा डिझेलच्या दर प्रति लि. ४१.५२ रू. होता. तद्‌नंतर या दरामध्ये खालील प्रमाणे वाढ / बदल झालेला आहे.

| दिनांक | डिझेलचा प्रति लि. दर |
|---|---|
| २५/०६/२०११ | रू.४५.२६ |
| ०१/०७/२०११ | रू.४५.४४ |
| ०८/०७/२०११ | रू.४४.७१ |

सध्या AMT व्यवस्थापनाला डिझेल करीता प्रति लि. दर रू. ४४.७१ द्यावा लागत आहे. म्हणजेच प्रति लि डिझेलला ३.१९ रूपये अधिक द्यावे लागत आहे. त्यामुळे दरमहा ३६,००० लिटरर्स डिझेलकरीता सरासरी १ लाख १४ हजार ८४० रूपये अधिक मोजावे लागत आहे.

टायरर्स दरामध्येही लक्षणीय वाढ झाली असून ती खालील प्रमाणे आहे.

| माहे | टायर साईज | प्रति टायर दर (MRF) |
|---|---|---|
| मार्च २०११ | ९.००x२० | १२,४५०/- |
| जानेवारी २०१२ | ९.००x२० | १४,०५०/-(रू. १६००/-ची वाढ) |
| मार्च २०११ | ७.५०x१६ | ७,४५०/- |
| जानेवारी २०१२ | ७.५०x१६ | ८,३१३/-(रू. ८६३/-ची वाढ) |

टायरर्सच्या खर्चामध्ये प्रति कि.मी. ०.३५ पैशांची वाढ झाली असून दरमहा १ लाख ५० हजार कि.मी. करीता ५२,५००/- रूपयांचा अतिरीक्त बोजा AMT व्यवस्थापनावर पडत आहे.

स्पेअर पार्टच्या किंमतीमध्येही सुमारे १०% वाढ झालेली असून त्याकरीता दरमहा ३०हजार रूपयांनी खर्चात वाढ झालेली आहे.

विशेष म्हणजे एस.टी. महामंडळ महाराष्ट्रातील विविध शहरामध्ये शहर बससेवा चालवीत असून AMT ने महामंडळ आकारीत असलेल्या दराप्रमाणे प्रवास भाडे प्रस्तावीत केले आहे. त्यामुळे पहिल्या १० कि.मी. च्या प्रवासाकरीता केवळ १/- रूपयाची वाढ प्रस्तावीत केलेली आहे. नगर शहरातील ८०% प्रवासी १० कि.मी. च्या आतच प्रवास करतात त्यामुळे प्रस्तावीत केलेली भाडेवाढ ही अत्यल्प असून त्यास त्वरीत मान्यता द्यावी ही विनंती.

येणेप्रमाणे श्री.रोहित परदेशी, मुख्य कार्य. अधिकारी , प्रसन्ना पर्पल मोबिलिटी सोल्युशन्स प्रा.लि. यांचे जा.नं.४३/२०१२ दिनांक ०१/०२/२०१२ रोजीचे पत्र

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--**--

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- शहर बस सेवेच्या प्रवासी भाडे दरामध्ये डिझेल, टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत विषय प्रस्ताव आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- प्रस्तावात डिझेल , पेट्रोल इंधन दरवाढीचा तक्ता दिला पण भाडयात रक्कम रूपये ५/- वाढविल्यास किती रक्कम वाढणार त्याचा उल्लेख नाही.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे.:- अहमदनगर शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर यांनी माहिती द्यावी.

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री.दिपक मगर :- आज प्रस्तावात रूपये ५/- वाढ नसुन रूपये १/- ने वाढ करावयाची आहे. रू. १/- वाढविल्यास ६ ते ७ टक्के वाढ होईल. महाराष्ट्र शासनाने माहे जुलै मध्ये एस.टी. महामंडळास वाढ दिली आहे.यानंतर २ ते ३ दिवसात इंधन वाढ होणार आहे.आम्हास बस सेवा ना नफा ना तोटा या तत्वावर चालवावी लागणार आहे. कुठल्याही शहरातील बससेवा ही तोटयातच चालु असते. कुठे तरी सबसीडी दिल्या शिवाय ती व्यवस्थीत चालु शकत नाही.

मा.श्री.भोसले ग.पुं. :- केडगाव, विनायकनगर ,बुरूडगांव अशी बस चालु करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- एम.आय.डी.सी. शेवटची बसची वेळ रात्री वाढवून घ्यावी रात्री-अपरात्री येणा-या कामगारांना अडचणीचे होते.

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- एम.आय.डी.सी. चे बस रात्री ९.३० वाजेपर्यत आहे.

मा.सौ. गंधे सु.मो. :- पाईप लाईन रस्त्याप्रमाणे गुलमोहर रस्त्यांवर बस चालु करावी.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- स्थानिक नागरिकांच्या मागणी प्रमाणे बस चालु करण्यात यावी.

मा.श्री. कोतकर सु. स.:- महानगरपालिकामार्फत चालु असलेली बस चास- कामरगांव पर्यत चालवावी तेथील रायसोनी इंजिनिअरींग कॉलेजला जाणा-या मुलांना गाडी अभावी अनेक अडचणी येतात.

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- चास- कामरगांव पर्यत बस चालविण्यास आपणांस परवानगी नाही. आर.टी.ओ. ची हरकत येईल. त्यांची परवानगी मिळत नाही. परवानगी साठी आपण पत्र दिले आहे.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- १० कि.मी. अंतराच्या पुढे महानगरपालिकेच्या किती बसेस चालतात.

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- १० कि.मी. च्या पुढे आजमितीस १९ बसेस चालतात. एकुण प्रवासी संख्या सतरा ते साडे सतरा हजार असते. जादा प्रवासी ६ ते ७ कि.मी. च्या अंतरावर असतात.

मा.उपायुक्त (कर) सौ. झगडे मॅडम :- १० कि.मी. च्या पुढे २०% लोक प्रवास करतात.

मा.श्री. जगताप नि.वि. :- सरसकट १/- रू. ने दरवाढ करावी.

मा.श्री. सातपुते दि.ना. :- सध्या बसेसवर महानगरपालिकेच्या नावाचा बोर्ड कुठेही आढळुन येत नाही. महानगरपालिकेच्या नावाचा ठळक अक्षरात बोर्ड लावण्यात यावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- बससेवा चालवावयास देताना बसेस वर महानगरपालिकेचे नाव टाकणे बाबत अट घालण्यात आली होती. अपंगाना बस सवलत देण्यात यावी.

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- अपंगाना पुर्वीपासूनच सवलत देत आहेत.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- मा. शासनाच्या परिपत्रकानुसार वाढ करण्यात यावी.

मॅके.इंजि. श्री. निकम पी.जे. :- १० कि.मी. पर्यंत १/- रू. वाढ व १० कि.मी. च्या पुढे २/- रू. व १२ ते १४ कि.मी. पर्यंत २/- रू. वाढ सुचविलेली आहे. मा. महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकात रक्कम रू.१/- वाढ दिलेली आहे.

मा.श्री. डागवाले कि.आ. / मा.श्री. जगताप नि.वि. :- मा. शासनाच्या परिपत्रकानुसार १/- रू. वाढ करण्यात यावी. ठराव मंजूर करावा.

मा.श्री. डागवाले कि.आ. :- सदर सरसकट १/- रूपया भाडे वाढीने तुम्हास होणारा तोटा कमी होईल काय ?

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- काही प्रमाणात होईल.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- बससेवा बंद करणेबाबत तुम्ही दिलेली नोटीस मागे घेतली काय ?

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- अजून मागे घेतलेली नाही.

मा.श्री. डागवाले कि.आ :- आजही सभा जर तुम्हाला भाडेवाढ देत आहे. तर मग तुम्ही ती नोटीस तात्काळ मागे घ्या.

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- होय.

मा.श्री. जगताप नि.वि. :- ही भाडे वाढ कधीपासून लागू करणार ?

शहर बस वाहतुक व्यवस्थापक श्री. दिपक मगर :- ठराव मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे पाठवावा लागेल तिकडून मंजुरी मिळाली की, भाडेवाढ होईल.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा. तसेच मुलांच्या तिकीट दरामध्ये रूपया १/- (एक)याप्रमाणे परिपत्रकानुसार वाढ करण्यांत यावी.

मा.श्री. कावरे द.ह. :- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे परिपत्रकानुसार किलोमीटर २ कि.मी ते ३० कि.मी. पर्यंत रूपया १/- व ३० कि.मी. ते ५० कि.मी. पर्यंत रूपये २/- याप्रमाणे तिकीटामध्ये प्रवास भाडे वाढ देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- मा. शासनाच्या परिपत्रकानुसार वाढ करण्यात यावी. ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका शहर बस सेवेच्या प्रवासी भाडे दरामध्ये डिझेल, टायर तसेच स्पेअर पार्टचे किंमतीमध्ये वाढ झाल्याने प्रस्तावीत प्रवासी भाडे दरवाढीस मंजूरी मिळणेबाबत मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि. चे मुख्य कार्य. अधिकारी श्री. रोहित परदेशी यांचा दिनांक १/०२/२०१२ अर्जानुसार व मा.स्थायी समिती ठराव क्र.७९ दि.२५/०१/२०१२ नुसार सर्व माहिती व त्यावरील ऑफिस रिपोर्ट पहाता खालीलप्रमाणे सर्वानुमते निर्णय घेण्यात येत आहे.

बसेसची संख्या तसेच प्रवासी मार्ग वाढवावेत तसेच अहमदनगर महानगरपालिकेचे नाव प्रत्येक शहर वाहतूक बस वर दिसेल अशा पध्दतीने मराठी भाषेत लिहिणेबाबत कार्यवाही करावी.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे जा.क्र.राप/वाह/चालन/सा.८८/भाडेवाढ /३९२९ दि.७ जुलै २०११ चे परिपत्रकानुसार ०२ कि.मी ते ३० कि.मी. पर्यत रूपया १/- (एक रूपया) व ३० कि.मी. ते ५०कि.मी. पर्यत रूपये २/-(दोन रूपये)याप्रमाणे तिकीटामध्ये प्रौढ प्रवासी दरामध्ये वाढ करण्यांत आलेली आहे. तसेच मुलांच्या तिकीट दरामध्ये रूपया १/- (एक)याप्रमाणे वाढ वाढ केलेली आहे. त्या आधारावर मे.प्रसन्ना पर्पल मोबीलिटी सोल्यु. प्रा.लि. यांना खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तिकीट प्रवासी दर वाढ लागू करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

| किलोमिटर | | सध्या लागू असलेले दर | | अभिकर्ता संस्थेने मागणी केलेले दर | | मा.स्थायी समितीने मंजुर केलेले दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| EXCEEDING किमी पेक्षा जास्त | NOT EXCEEDING किमी पर्यंत | प्रौढ | मुल | प्रौढ | मुल | प्रौढ | मुल |
| ० | २ | ५.०० | ३.०० | ६.०० | ३.०० | ६.०० | ३.०० |
| २ | ४ | ५.०० | ३.०० | ६.०० | ३.०० | ६.०० | ३.०० |
| ४ | ६ | ६.०० | ३.०० | ७.०० | ४.०० | ७.०० | ४.०० |
| ६ | ८ | ७.०० | ४.०० | ८.०० | ४.०० | ८.०० | ४.०० |
| ८ | १० | ९.०० | ५.०० | १०.०० | ५.०० | १०.०० | ५.०० |
| १० | १२ | १०.०० | ५.०० | १२.०० | ६.०० | ११.०० | ६.०० |
| १२ | १४ | १२.०० | ६.०० | १४.०० | ७.०० | १३.०० | ७.०० |
| १४ | १६ | १३.०० | ७.०० | १६.०० | ८.०० | १४.०० | ८.०० |
| १६ | १८ | १५.०० | ८.०० | १९.०० | १०.०० | १६.०० | ९.०० |
| १८ | २० | १७.०० | ९.०० | २१.०० | ११.०० | १८.०० | १०.०० |
| २० | २२ | २०.०० | १०.०० | २३.०० | १२.०० | २१.०० | ११.०० |
| २२ | २४ | २४.०० | १२.०० | २५.०० | १३.०० | २५.०० | १३.०० |
| २४ | २६ | २६.०० | १३.०० | २७.०० | १४.०० | २७.०० | १४.०० |
| २६ | २८ | २८.०० | १४.०० | २९.०० | १५.०० | २९.०० | १५.०० |
| २८ | ३० | ३०.०० | १५.०० | ३१.०० | १६.०० | ३१.०० | १६.०० |
| ३० | ३२ | ३०.०० | १५.०० | ३२.०० | १६.०० | ३२.०० | १६.०० |
| ३२ | ३४ | ३२.०० | १६.०० | ३३.०० | १७.०० | ३३.०० | १७.०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | ३६ | ३२.०० | १६.०० | ३४.०० | १७.०० | ३४.०० | १७.०० |
| ३६ | ३८ | ३४.०० | १७.०० | ३६.०० | १८.०० | ३६.०० | १८.०० |
| ३८ | ४० | ३४.०० | १७.०० | ३६.०० | १८.०० | ३६.०० | १८.०० |
| ४० | ४२ | ३६.०० | १८.०० | ३७.०० | १९.०० | ३७.०० | १९.०० |
| ४२ | ४४ | ३६.०० | १८.०० | ३८.०० | १९.०० | ३८.०० | १९.०० |
| ४४ | ४६ | ३८.०० | १९.०० | ३९.०० | २०.०० | ३९.०० | २०.०० |
| ४६ | ४८ | ३८.०० | १९.०० | ४०.०० | २०.०० | ४०.०० | २०.०० |
| ४८ | ५० | ४०.०० | २०.०० | ४२.०० | २१.०० | ४२.०० | २१.०० |

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.
सुचक :-मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक सही /-

अनुमोदक :- मा.श्री. कावरे दत्तात्रय हरिभाउ सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका